# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या आवळा फळांचा जाहीर लिलाव

## परिपत्रक

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या आवळा फळांचा जाहीर लिलाव आहे त्या स्थितीत करण्याचे निश्चित केलें आहे.

दिनांक 11/08/ 2020 रोजी आवळा फळांचा जाहीर लिलाव दुपारी 12:30 वाजता विद्यापीठ उद्यान कार्यालय येथे होणार आहे.

तरी ज्यांना सदरील जाहीर लिलावात बोली बोलावयाची असेल त्यांनी लिलावापूर्वी आवळा फळांसाठी अनामत रक्कम रू. 500/- (अक्षरी- पाचशे रुपये फक्त) लेखा विभागाकडे रोखीने भरून ती पावती विद्यापीठ उद्यान विभागात जमा करावी. पावती जमा केल्याशिवाय लिलावात सहभागी होता येणार नाही.

जाहीर लिलावातील अटी व नियम सोबत जोडले आहेत.

संदर्भ क्र. विद्यापीठ उद्यान/आवळा फळबाग लिलाव/2020/ 3910 118

दि० 4/8/2020

RSuryawanshi

मा. कुलसचिव

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
## विद्यापीठ उद्यान अंतर्गत असणाऱ्या आवळा फळांचा जाहीर लिलाव
## लिलावाच्या आटी व नियम खालीलप्रमाणे आहेत.

1) विद्यापीठ परिसरातील आवळा फळांच्या जाहीर लिलावात भाग घेण्यासाठी अनामत रक्कम रू. 500/- लेखा विभागात भरावी लागेल.
2) महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शासकीय/निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना जाहीर लिलावात भाग घेता येणार नाही.
3) भरलेल्या अनामत रक्कमेची पावती दाखविल्याशिवाय बोली बोलता येणार नाही व लिलावात भाग घेता येणार नाही.
4) लिलावास प्रारंभ करताना कमीत कमी रू. 1,000/- पासून बोलीस प्रारंभ करावा ही बोली रू. 1,000/- च्या पटीत असावी.
5) जाहीर लिलावात ज्यांची बोली मान्य होईल त्यांना फळझाडांची देखभाल व संरक्षण स्वत: करावी लागेल. लिलाव घेतल्यानंतर फळांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
6) जाहीर लिलावातील बोलीची पूर्ण रक्कम लेखा विभागाकडे जमा करावी लागेल. त्यानंतरच फळझाडांचा ताबा देण्यात येईल.
7) आवळा फळझाडांची सुरक्षा ठेव म्हणून जाहीर लिलावात भाग घेण्यासाठी भरण्यात आलेल्या रक्कमे व्यतिरिक्त रू. 2,000/- अगोदर भरावे लागेल, झाडांना इजा पोहचल्यास सुरक्षा रक्कम कपात केली जाईल.
8) आवळा फळे संपल्यानंतर भरलेले 500 + 2,000 = 2,500/- रू. कक्षअधिकारी (उद्यान), विद्यापीठ उद्यान यांचा अभिप्राय मिळाल्याशिवाय पैसे परत मिळणार नाही.
9) अनामत रक्कम व सुरक्षा रक्कम केवळ धनादेशा//RTGS द्वारेच परत केली जाईल.
10) शेतीमध्ये इतर पीके घेता येणार नाहीत. पीके घेतल्यास मा. कुलसचिवांच्या आदेशानुसार कार्यवाही केली जाईल.
11) विद्यापीठ परिसरात बाहेरील फळे आणून विकता येणार नाही व विद्यापीठ परिसरात स्टॉल लावून फळे विक्री करण्यासाठी मा. कुलसचिव यांची परवानगी घ्यावी लागेल.
12) प्रथम क्रमांक बोली धारकाने निर्धारित वेळेत लिलावात निश्चित झालेली रक्कम न भरल्यास प्रथम क्रमांक बोली धारकाची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.
13) ज्यांनी आवळा लिलाव घेतला त्यांचा कालावधी हा घेतलेल्या कालावधीपासून मालाचा उठाव करेपर्यंत किंवा डिसेंबर 2020 पर्यंत राहील अथवा सद्याचा एकच फळ बहार राहील, ही अट बंधनकारक असेल.
14.) लिलावातील बोलीची अपेक्षित किंमत न मिळाल्यास ती मान्य अथवा अमान्य करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे.

J.Suryawansh.

मा. कुलसचिव